~~218~~ 176

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग

# आदिवासी महिलांची स्थिती - मूल्यमापन अहवाल

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१

२००६

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग

# आदिवासी महिलांची स्थिती - मूल्यमापन अहवाल

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१

२००६

# प्रस्तावना

आदिवासी समाजात स्त्रियांचे प्रमाण साधारणपणे ५०% आहे. स्त्री ही मातृत्वाची भूमिका पार पाडते. प्रत्येक व्यक्तीच्या जिवनातील पहिला गुरु आई असते. आईने दिलेल्या संस्काराची परिणामकता भावी पिढीच्या जडण घडणाशी संबंधीत आहे. त्यासाठी स्त्री ही सुशिक्षित व सुसंस्कृत असणे आवश्यक आहे. आदिवासी महिलांची प्रगल्भता, जाणकारी, साक्षरता इतर महिलांपेक्षा कमी आहे. महिलांच्या सहभागाशिवाय कुटुंबास पूर्णत्व प्राप्त होत नाही. आदिवासी महिलांची साक्षरता आणि जाणकारी इत्यादि बाबी कमी प्रमाणात आहे. विकास प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग महत्वाचा आहे.

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली "मूल्यमापन विषय निवड समितीची" (तज्ञ व्यक्ति असलेल्या) बैठक दिनांक ३१.१.२००४ रोजी झाली. या बैठकीमध्ये मूल्यमापन करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या विषयांमध्ये "आदिवासी महिलांची स्थिती" या विषयाचा मूल्यमापन अभ्यास हाती घेण्याची शिफारस करण्यात आली. माननीय मंत्री महोदय, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या **नियामक मंडळाच्या** दिनांक १०.२.२००४ रोजीच्या बैठकीत या विषयाचा मूल्यमापन अभ्यास करण्याचे ठरले.

भारतीय जनगणना २००१ प्रमाणे महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ९,६८,७८,६२७ इतकी असून त्यामध्ये ५,०४,००,५९५ पुरुष आहेत व ४,६४,७८,०३१ महिला आहेत. या वरुन दर हजार पुरुषामागे ९२२ स्त्रिया आहेत. म्हणजेच १००० : ९२२ असे प्रमाण आहे.

महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी ८५,७७,२७६ इतकी लोकसंख्या आदिवासींची आहे. त्यात ४३,४७,७५४ पुरुष तर ४२,२९,५२२ महिला आहेत. या वरुन दर हजार आदिवासी पुरुषामागे ९७३ आदिवासी महिला आहेत. म्हणजेच १०००:९७३ असे प्रमाण आहे.

एखाद्या समाजाची सर्वांगिण प्रगती किंवा विकास साधावयाचा असेल तर त्या समाजातील घटक बलवान, सुदृढ व शिक्षित असणे अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीकोनातून विचार केल्यास आदिवासी समाज आज अज्ञानाच्या, दारिद्रयाच्या अंधारात चाचपडत आहे. त्यांना या अंधारातून

प्रकाशाकडे नेण्यासाठी शिक्षण हा घटक उपयोगी ठरणार आहे. विशेषकरुन आदिवासींमध्ये महिलांच्या निरक्षरतेचे प्रमाण अतिशय जास्त आहे.

"स्त्री व पुरुष हे समाजाचे दोन पंख आहेत. केवळ एका पंखाने पक्षाला उडता येत नाही. त्यांचे दोन्ही पंख मजबूत असावे लागतात. समाजाचेही तसेच आहे." असे स्वामी विवेकानंद म्हणतात.

जन्मापासून मृत्युपर्यंत स्त्रीला वेगवेगळया भूमिका पार पाडाव्या लागतात. मुलगी, बहीण, पत्नी, सून, आई, म्हणून ती वेगवेगळया रुपात पुरुषांना मान देते आणि या भूमिका बजावतांना तिला अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. तिचे हक्क, तिचे कर्तव्य आणि तिला असणारी जबाबदारीची जाणीव यामुळे तिला समाजात एक दर्जा प्राप्त होतो.

अमेरिकेतील प्रसिध्द सामाजिक मानवशास्त्रज्ञ रॉबर्ट लावी यांनी आदिम समाजातील स्त्रीचा दर्जा ठरतवाना -

प्रत्यक्ष वागणूक,

कायदेशीर वागणूक,

सार्वजनिक कामाची संधी,

कामाचे स्वरूप व व्याप्ती

- या चार गोष्टी विचारात घ्याव्यात असे सुचविले आहे. वंशपरंपरा, लग्नानंतरचे निवासस्थान, सत्तापध्दती, अर्थिक सहयोग या बाबींचाही स्त्रियांच्या दर्जावर परिणाम होतो.

डोरोची हामन्ड आणि अल्टा जॅबलो (१९७७) यांच्या मते जगातील सर्व समाजात, अथवा सर्व समाजाच्या लिखित इतिहासात प्रामुख्याने कुटुंब हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र असते. तिचे नातेसंबंध आणि तिची जडणघडण ही कुटुंबाशी निगडीत असते. कुटुंबातील तिच्या भूमिकेचा अभ्यास करणे म्हणजे तिला समजून घेणे किंवा तिचा दर्जा समजून घेणे.

आदिवासी स्त्री ही शहरी अथवा ग्रामीण स्त्रियांपेक्षा भिन्न असते. आदिवासी "स्त्री" पुरुषा सारखी निडर असते. ती रानावनातून मुक्तपणे संचार करीत असते, इतर स्त्रियांपेक्षा ती परिश्रमी असते, इतर स्त्रियांसारखी लाजाळू नसलेली आदिवासी स्त्री अतिशय प्रामाणिक असते. नवरा

निवडण्याचा अधिकार आदिवासी मुलींना असतो. मानववंश शास्त्रज्ञांनी जगातील वेगवेगळया भागातील स्त्रियांचे स्थान या विषयावर रंजक अभ्यास प्रस्तुत केला आहे. यातील संशोधनानुसार स्त्रियांचे कुटुंबातील स्थान या बाबत परस्परभिन्न मते असलेली आढळून येतात. काही संशोधकांच्या मते आदिम जमातीत स्त्रियांचे कुटुंबात स्थान अथवा दर्जा हे फार वरचे असते तर काहींच्या मते आदिम जमातीतील स्त्रियां या दबलेल्या असतात, पुरुषांच्या वर्चस्वाखाली असतात. (श्रीनिवास : १९७७).

आदिवासी समाजाच्या विकासाच्या दृष्टिने आदिवासी महिलांची स्थिती काय आहे हे पाहणे गरजेचे आहे. त्याकरिता "आदिवासी महिलांची स्थिती" या विषयाची मूल्यमापन अभ्यासाकरिता निवड करण्यात आली आहे.

जोडपत्र क्र.३ मध्ये उल्लेख केलेल्या सर्व पथकांनी मिळविलेल्या माहितीच्या आधारे हा मूल्यमापन अहवाल लिहिण्यात आला. मा.आयुक्त महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेतील श्री अ.फ.शेरकर, उच्च श्रेणी लघुलेखक, व श्रीमती स.अ.नाझरे, सांख्यिकी सहाय्यक, या दोघांनी आपले दैनंदिन कामकाज सांभाळून मिळालेल्या माहितीचे पृथक्करण केले व संगणाकावर हा मूल्यमापन अहवाल लिहून पूर्ण केला.

**(वाय.पी.एस.तोमर)**
भा.प्र.से.
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

पुणे
दि.१५ऑगस्ट २००६

# अ नु क्र म णि का


| अ.क्र. | प्रकरण | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | मूल्यमापन अभ्यासाची उद्दिष्टये | ४ |
| २. | मूल्यमापन अभ्यासाची कार्यप्रणाली | ५ |
| ३.१ | सामाजिक दर्जा | ९ |
| ३.२ | शैक्षणिक स्थिती | १६ |
| ३.३ | आरोग्य विषयक स्तर | २१ |
| ३.४ | आर्थिक स्थिती | ३१ |
| ३.५ | राजकीय स्थिती | ३७ |
| ४ | शिफारशी | ४२ |

| अ.क्र. | जोडपत्र | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | संदर्भ सूची | ४६ |
| २ | प्रश्नावली | ४७ |
| ३ | संशोधन पथक | ५१ |

प्रकरण १

# मूल्यमापन अभ्यासाची उद्दिष्टये

आदिवासी महिलांची स्थिती या विषयाच्या अनुशंघाने महिलांची साक्षरता, आरोग्य, अर्थिक स्थिती इत्यादी बाबीच्या दृष्टीने हा मूल्यामापन अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी पुढील उद्दिष्टये ठेवण्यात आली :-

**उद्दिष्टये :-**

१. आदिवासी स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचा अभ्यास करणे,

२. आदिवासी स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण अभ्यासणे,

३. आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे,

४. आदिवासी स्त्रियांच्या आरोग्यविषयक स्थितीचा अभ्यास करणे,

५. आदिवासी स्त्रियांचा राजकीय क्षेत्रातील सहभाग अभ्यासणे.

आदिवासी महिलांची स्थिती या विषयाचा अभ्यास करण्याकरीता, आदिवासी महिलांची माहिती घेण्याकरीता तयार करण्यात आलेली प्रश्नावली जोडपत्र क्र.२ मध्ये दाखविण्यात आलेली आहे. सदर प्रश्नावली पुढील मुख्य मुद्यांवरआधारीत आहे:-

१) आदिवासी महिलांचा सामाजिक दर्जा,

२) आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती,

३) आदिवासी महिलांचा आरोग्य विषयक स्तर,

४) आदिवासी महिलांची आर्थिक स्थिती,

५) आदिवासी महिलांची राजकीय स्थिती.

* * *

| प्रकरण २ | मूल्यमापन अभ्यासाची कार्यप्रणाली |
|---|---|

महाराष्टातील एकूण ७ जिल्हे या पाहणीसाठी निवडण्यात आले. त्याची सविस्तर माहिती तक्ता क्रमांक २.१ मध्ये देण्यात आलेली आहे. कार्यालयातील अधिकारी व त्यांच्या अधीनस्त देण्यात आलेले कर्मचारी असे सात (७) पथके माहिती मिळविण्या करिता तयार करण्यात आले. त्याची माहिती जोडपत्र क्र. ३ मध्ये देण्यात आलेली आहे. निश्चित केलेल्या जिल्हयातील आदिवासी गावे व पांडयावर प्रत्यक्षात जाऊन या पथकांनी तेथील आदिवासी महिलांना भेटून, त्यांना बोलतं करुन माहिती मिळवली. अभ्यास करण्यासाठी पुढील कार्यप्रणाली वापरण्यात आली:-

१. प्रश्नावली व्दारे आदिवासी स्त्रियांची माहिती मिळविण्यात आली.

२. प्रश्नावलीच्या अनुषंगाने उपप्रश्न करून चर्चेव्दारे आदिवासींकडून अनौपचारीक गप्पागोष्टीं मधून अर्थबोधक माहिती मिळविण्यात आली, व ज्या ठिकाणी माहितीची गरज भासली त्या ठिकाणी तिचा उपयोग करण्यात आलेला आहे.

३. गावातील प्रमुख व्यक्ति म्हणजे सरपंच, तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते यांच्या गाठी भेटी घेऊन चर्चेव्दारे माहिती गोळा करण्यात आली.

४. संस्थेतील डाटा बँकेतील माहितीचा उपयोग करण्यात आला.

५. संदर्भ ग्रंथांचा वापर करण्यात आला.

**अभ्यास क्षेत्र**

आदिवासी स्त्रियांची सद्यस्थिती अभ्यासण्यासाठी प्रश्नावली "नमुना निवड पाहणी" तयार करताना सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आर्थिक व राजकीय हे पाच दृष्टिकोन समोर ठेऊन करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी स्त्रियांच्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक, आर्थिक, व राजकीय स्थितीचा अभ्यास करण्यासाठी गोंडवना, सह्याद्री व सातपुडा या पट्टयांमधील तक्ता क्र. २.१ मध्ये नमुद केलेल्या ७ जिल्हयातील अति दुर्गम व रस्त्यालगतच्या ४९ पाडयांमध्ये

सर्व्हेक्षण करण्यात आले. या सर्व्हेक्षणात वेगवेगळया १३ आदिवासी जमातींच्या १४० स्त्रियांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

**तक्ता क्र. २.१**

**अभ्यास करण्यात आलेल्या आदिवासी महिलांची जमात व ठिकाण**

| अ. क्र. | जमात | जिल्हा | तालुका | पाडा/ गाव / वस्ती | संख्या | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | महादेव कोळी | नांदेड | हादगाव | खरटवाडी | १ | १३ |
| | | | किनवट | एकतानगर | १ | |
| | | नाशिक | दिंडोरी | कोचरगांव | ११ | |
| २. | मन्नेरवारलू | नांदेड | हादगाव | खरटवाडी | १ | १ |
| ३. | कोलाम | यवतमाळ | झरी | गारगोटी | १ | २ |
| | | | केळापूर | गवराई मुच्छी | १ | |
| ४. | कोरकू | अमरावती | धारणी | हारदोली | १३ | १३ |
| ५. | पावरा | नंदुरबार | धडगांव | चोंदवाड | ६ | १० |
| | | | | भानुली | ४ | |
| ६. | भिल्ल | नंदुरबार | धडगांव | सूरनावी (मोठी) | ५ | ११ |
| | | | | वरखेडी | ३ | |
| | | | | खर्डा | २ | |
| | | | | गोरंबा | १ | |
| ७. | कोकणा | नाशिक | कळवण | नरूळ | ३ | ११ |
| | | | | कातळगांव | २ | |
| | | | | मोहनदरी | २ | |
| | | | | कान्हेर वाडी | ३ | |
| | | | | विरशेत | १ | |
| ८. | कातकरी | ठाणे | शहापूर | बेरसिंगीपाडा | ८ | ८ |
| ९. | ठाकूर | | | भोरपाडा | २ | ५ |
| | | | | आसनगांव | २ | |
| | | | | तालवाडा | १ | |
| १० | आंध | नांदेड | किनवट | विठ्ठल नगर | १ | ५ |
| | | | | चिखली खुर्द | १ | |
| | | | | टिंगणवाडी | १ | |
| | | | | शनिवारपेठ | १ | |
| | | | | पाटोदा | १ | |

| अ. क्र. | जमात | जिल्हा | तालुका | पाडा/ गाव / वस्ती | संख्या | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ११. | परधान | नांदेड | किनवट | गोकुरा | १ | १२ |
| | | यवतमाळ | केळापूर | सुसरी | १ | |
| | | चंद्रपूर | कोरपना | चेनई खुर्द | ४ | |
| | | | राजूरा | तुलाना | २ | |
| | | | | बामनवाडा | ४ | |
| १२. | वारली | ठाणे | शहापूर | बोरीचा पाडा | ५ | ९ |
| | | | | भोसपाडा | ४ | |
| १३. | गोंड | यवतमाळ | झरी | धाबाडी क्र २ | २ | ४० |
| | | | | धाबाडी खुर्द | १ | |
| | | | केळापूर | झुली | २ | |
| | | | | मांगुरडे | १ | |
| | | | घाटंजी | जांब | १ | |
| | | चंद्रपूर | राजूरा | उमरझरा | २ | |
| | | | | चिंचबोडी | १ | |
| | | | | खिर्डी | १ | |
| | | | | वामनपाडा | १ | |
| | | | | जग्गुगुंडा | २ | |
| | | | कोरपना | चनई | २ | |
| | | | | कान्हळगांव | २ | |
| | | नांदेड | किनवट | कोठारी | २ | |
| | | अमरावती | धारणी | मलकागुंडा | १ | |
| | | | | दुनी | ७ | |
| | | | | चाकर्दा | ८ | |
| | | | | हारदोली | २ | |
| | | | | कारादा | २ | |
| | | | | **एकूण** | **१४०** | **१४०** |

**अभ्यासाची मर्यादा**

महाराष्ट्र राज्यातील सर्व आदिवासी स्त्रियांना भेटून, त्यांच्या कडून प्रश्नावली व्दारे माहिती उपलब्ध करणे केवळ अशक्यप्राय होते. त्यामुळे नमूना पहाणी करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यासाठी तक्ता क्र. २.१ मध्ये दर्शविलेल्या जिल्हयातील पाडयात विविध जमातीतील आदिवासी महिलांना भेटून नमूना पहाणी करण्यात आली. त्यामुळे या अभ्यासाव्दारे निर्माण होणारे अनुमान सरसकट सर्व आदिवासी स्त्रियांना लावता येणार नाही, ही या अभ्यासाची सर्वात मोठी मर्यादा असेल असे म्हणावयास हरकत नाही.

* * *

| प्रकरण ३.१ | सामाजिक दर्जा |
|---|---|

महाराष्ट्रातील आदिवासी महिलांचा सामाजिक दर्जा जाणून घेण्यासाठी पुढील मुद्यांच्या माध्यमातून मूल्यमापन आभ्यास करण्यात आला. त्यांचे कुटुंबात असलेले स्थान, महिला म्हणून कुटुंबात मिळणारी कनिष्ठ किंवा वेगळी वागणूक, हुंडा पध्दतीचे समाजात असलेले अस्तित्व, वधू पक्षाकडून "हुंडा" घेतला जातो का किंवा वर पक्षाकडून "देज" दिला जातो, बहुपत्नी पध्दतीला समाज मान्यता, आदिवासी महिलांना घटस्फोट घेण्याची मुभा समाज देतो काय, समाजात विधवांना मिळणारी वागणूक, तसेच विधवा पुर्नविवाहाची परवानगी आहे काय, अशा विविध मुद्यांवर प्रत्यक्ष मूल्यमापन पाहणी करण्यात आली.

**आदिवासी महिलांचे वयोगटानुसार वर्गीकरण**

आदिवासी महिलांची स्थिती अधिक स्पष्ट होण्याच्या दृष्टीने, आदिवासी मुलींचे लग्नाचे वय कमी असल्याचे लक्षात घेऊन, "महिला" या सदरात वय वर्षे १६ पासूनच्या महिलांचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच २६ ते ३५ या वयोगटातील स्त्रियांचे प्रमाण इतर वयोगटाच्या तुलनेत जास्त घेण्यात आलेले आहे हे तक्ता क्र. ३.१.१ वरुन स्पष्ट होईल.

**तक्ता क्र ३.१.१**

| अ.क्र. | वयोगट | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १६ ते २५ | ३७ | २६ |
| २. | २६ ते ३५ | ४५ | ३३ |
| ३. | ३६ ते ४५ | ३७ | २६ |
| ४. | ४६ चे पुढे | २१ | १५ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

### आदिवासी महिलांची वयोगटानुसार वैवाहिक स्थिती

तक्ता क्र ३.१.२ मधील माहिती नुसार असे आढळून येते की, ३ महिला अविवाहित आहेत. तसेच १२ महिला विधवा आहेत व एकही महिला घटस्फोटीत आढळून आलेली नाही. मूल्यमापन पाहणीत समाविष्ट असलेल्या महिलांमध्ये अविवाहित महिलांची संख्याही खूपच कमी आढळून आलेली आहे. लग्नाच्या पध्दती बाबत विचारणा केली असता मुलीचे लग्न वडिलधाऱ्यांच्या प्रयत्नातून ठरत असले तरी मुलीची मर्जी विचारण्यात येते.

**तक्ता क्र ३.१.२**

| अ.क्र. | वयोगट | संख्या | | | | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विवाहित | अविवाहित | विधवा | घटस्फोट | | |
| १. | १६ ते २५ | ३५ | २ | --- | ० | ३७ | २६ |
| २. | २६ ते ३५ | ४५ | --- | --- | ० | ४५ | ३३ |
| ३. | ३६ ते ४५ | २९ | १ | ७ | ० | ३७ | २६ |
| ४. | ४६ चे पुढे | १६ | ---- | ५ | ० | २१ | १५ |
| | **एकूण** | **१२५** | **३** | **१२** | **०** | **१४०** | **१००** |

### आदिवासी महिलांचे कुटुंबातील स्थान

बहुसंख्य महिलांना त्यांच्या कुटुंबात दुय्यम स्थान आहे. काही महिला, त्यांना कुटुंब प्रमुखाचा दर्जा असल्याचे सांगतात. कुटुंब प्रमुख म्हणजे हया स्त्रिया आर्थिक दृष्टिने कुटुंबाची जबाबदारी सांभाळतात मात्र त्या कोणताही निर्णय स्वतंत्रपणे घेत नाहीत. त्या सर्वस्वी घरातील पुरुषांवरच अवलंबून असतात. तक्ता क्र ३.१.३ मधील संकलित माहिती प्रमाणे ८१ % आदिवासी कुटुंबातील महिलांना दुय्यम स्थान असल्याचे निदर्शनास येते तर १९ % कुटुंबातील महिला स्वतः कुटुंबप्रमुख असल्याचे सांगतात.

**तक्ता क्र ३.१.३**

| अ.क्र. | कुटुंबातील स्थान | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कुटुंबप्रमूख | २६ | १९ |
| २. | दुय्यम स्थान | ११४ | ८१ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

### कुटुंबाचा प्रकार

आदिवासींकडे मुळातच स्वतःची शेत जमीन फारच कमी किंवा नगण्य आहे. कालांतराने त्यांच्या कुटुंब सदस्यांमध्ये वाढ होत गेली व शेती मधून मिळणारे तुटपुंजे उत्पन्न कुटुंबाला पुरेनासे होत गेले. त्यामुळे उदरनिर्वाहासाठी त्यांच्यात स्थलांतर होत गेले. याचाच परिणाम म्हणून विभक्त कुटुंब पध्दती अस्तित्वात आली असावी. त्याचप्रमाणे आधुनिकतेमुळेही आदिवासी समाजातील एकत्रीत कुटुंब पध्दतीवर परिणाम होत असावा. तरी आजही आदिवासी समाजात एकत्र कुटुंब पध्दती मोठया प्रमाणावर अस्तित्वात आहे. विभक्त कुटुंबात एकाच पुरुषावर कुटुंबाची जबाबदारी येत असल्यामुळे अशा कुटुंबात स्त्रियांचे महत्व वाढत आहे.

**तक्ता क्र ३.१.४**

| अ.क्र. | कुटुंबाचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | एकत्रीत | ९८ | ७० |
| २. | विभक्त | ४२ | ३० |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र. ३.१.४ मधील संकलित माहिती नुसार ७०% महिला एकत्रित कुटुंबातील असून ३०% महिला विभक्त कुटुंबातील आहेत.

### महिला असल्याने वेगळी वागणूक मिळणे

आदिवासी कुटूंबात, कुटूंबातिल प्रत्येक सदस्य पुरुष असो किंवा स्त्री असो हा कमावता असल्यामुळे व त्याचा अर्थिक हातभार लागत असल्यामुळे तो कुटुंबाचा आधार असतो. आदिवासी समाज व कुटुंब पध्दती मध्ये महिला पुरुषांच्या खांदयाला खांदा लावून अर्थाजन करीत असल्यामुळे, त्या "महिला" आहेत म्हणून त्यांना वेगळे वागविले जात नाही. तक्ता क्र. ३.१.५ चे अवलोकन केले असता "महिला" म्हणून वेगळी वागणूक मिळत नाही असे निदर्शनास आले आहे. या ठिकाणी येथे आणखी एक गोष्ट नमूद करण्यात येते की काही जमातीत मुलीला तिच्या लग्नाच्या वेळेस वरपक्षास हुंडा द्यावा लागत नाही. तसेच मुलीच्या आई वडीलांना वर पक्षाकडून देज

देण्याची पध्दत असल्यामुळेही "महिला" म्हणून कुटुंबात किंवा समाजात वेगळी वागणूक मिळत नाही.

**तक्ता क्र ३.१.५**

| अ.क्र. | महिला म्हणून वेगळी वागणूक मिळणे | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ०३ | २ |
| २. | नाही | १३७ | ९८ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

**नवऱ्या मुलास हुंडा देण्याची पध्दत**

वरपक्षाकडून "देज" घेण्याची पध्दत अस्तित्वात आहे. परंतु शहरी लोकांच्या सान्निध्यात आल्यामूळे काही प्रमाणात नवऱ्या मुलास हुंडा देण्याची पध्दत हळु हळु अस्तित्वात येत असल्याचे आढळते. आदिवासी मध्ये येत असलेल्या सामाजिक बदलांमध्ये ही पध्दत शिरकाव करू पहात आहे.

**तक्ता क्र ३.१.६**

| अ.क्र. | हुंडा पध्दत | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आहे | १३ | ९ |
| २. | नाही | १२७ | ९१ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

उपरोक्त तक्ता क्र. ३.१.६ चे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, ९% महिलांनी त्यांच्या समाजात नवऱ्या मुलास हुंडा देण्याची पध्द्त आहे अशी माहिती दिली. मात्र ९१% महिलांनी मुलींकडून हुंडा घेण्याची पध्द्त अस्तित्वात नाही, या उलट वर पक्षाकडूनच "देज" घेण्याची पध्दत काही ठिकाणी अस्तित्वात आहे असे सांगितले. अन्य समाजामध्ये हुंडाबळीचे प्रकार घडत असतांना आदिवासी महिलांनाच हुंडा मिळत असल्याने आदिवासी समाजात हुंडाबळीचे प्रकार आढळून येत नाहीत.

**एक पत्नी पध्दत**

एक कमावता सदस्य कुटुंबात वाढेल या दृष्टीने आदिवासी संस्कृती मध्ये बहुपत्नी पध्दत आस्तित्वात आली असावी. हिंदु विवाह कायदा आदिवासींना लागू नाही तरीही या जमातींमध्ये बहुसंख्य आदिवासी समाजात एक पत्नी पध्दत रूढ आहे.

**तक्ता क्र ३.१.७**

| अ.क्र. | एक पत्नी पद्धत | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आहे | १२६ | ९० |
| २. | नाही | ११ | ८ |
| | **बेरीज** | १३७ | १०० |
| ३. | अविवाहीत | ०३ | निरंक |
| | **एकूण** | **१४०** | **निरंक** |

तक्ता क्र. ३.१.७ चे अवलोकन केले असता असे लक्षात येते की ९०% महिलांनी दिलेल्या माहिती नुसार प्रथम पत्नी जीवंत असताना पती दुसरा विवाह करत नाही.

**घटस्फोट घेण्याची पद्धत**

आदिवासी समाजात घटस्फोटाची पध्दत अस्तित्वात आहे. तसेच महिलांनी घटस्फोट मागण्यास समाजाची मान्यता आहे. घटस्फोट घेण्याचा निवाडा वडीलधारी माणसं सदस्य असलेल्या जात पंचायती मार्फत होतो. परंतु, सहसा घटस्फोट घेतला किंवा दिला जात नाही. वडीलधारे व अनुभवी समाज सदस्य नवरा-बायकोमध्ये समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. तरीही त्याच्यात काही बेबनाव झाल्यास गाव पंचाकडून घटस्फोटास मान्यता घ्यावी लागते. तक्ता क्र.३.१.८ मधील संकलित महितीवरुन ८१% आदिवासी महिलांना त्यांच्या समाजात त्यांना घटस्फ़ोट मागण्याची मुभा आहे असे असले तरी घटस्फोटाचे प्रमाण मूल्यमापन पाहणीत आढळून आलेले नाही.

**तक्ता क्र ३.१.८**

| अ.क्र. | घटस्फ़ोट पद्धती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आहे | ११३ | ८१ |
| २. | नाही | २७ | १९ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

**विधवांना धार्मिक कार्यात मान व पुनर्विवाहाची परवानगी असणे**

आदिवासी समाज व्यवस्थेमध्ये विधवा पुनर्विवाहास समाज मान्यता आहे. विधवांना शापित स्त्रि समजले जात नाही. त्यांना समाजात वेगळी वागणूक मिळत नाही. इतकेच नव्हे तर धार्मिक कार्यात इतर समाज सदस्यांप्रमाणे विधवा स्त्रियांना मान दिला जातो. स्वतः विधवा स्त्रिया देखील समाजात वावरताना स्वतःला कमी लेखत नाहीत. सर्वसाधारण स्त्रियांप्रामणेच त्यांची वागणूक असते. आदिवासी समाजात विधवा असणे हे कलंकित मानले जात नाही.

**तक्ता क्र ३.१.९**

| अ.क्र. | विधवा पुनर्विवाहास मान्यता | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आहे | ११६ | ८३ |
| २. | नाही | २४ | १७ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

**तक्ता क्र ३.१.१०**

| अ.क्र. | विधवांना धार्मिक कार्यात मान | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ७० | ५० |
| २. | नाही | ७० | ५० |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र. ३.१.९ मधील संकलित माहिती प्रमाणे ८३% आदिवासी महिलांच्या सांगण्या प्रमाणे त्यांच्या समाजात विधवांना पुनर्विवाहाची परवानगी आहे व तक्ता क्र.३.१.१० मधील संकलित माहितीप्रमाणे ५०% कुटुंबात घरातील विधवांना धार्मिक कार्यात मान दिला जातो.

वरील सर्व मुद्यांचा एकत्रित विचार केला असता, झालेल्या मूल्यमापन पाहणीतून आदिवासी महिलांना त्यांच्या समाजात स्वतंत्र सामाजिक अस्तित्व असल्याचे जाणवते.

* * *

**प्रकरण ३.२**

# शैक्षणिक स्थिती

शिक्षण ही एकच गोष्ट अशी आहे की ज्याची कास धरून माणसाला आपली प्रगती करुन घेता येते. भारताच्या सामाजिक इतिहासात असे अनेक जनसमुह दाखवता येतील की ज्यांनी केवळ शिक्षणाच्या जोरावर स्वत:ची प्रगती करून घेतलीच पण समाजातही महत्वाचे स्थान मिळविले.

शिक्षणाच्या बाबतीत आदिवासी समाज हा सर्वात मागे राहिलेला समाज आहे. इतर समुहांच्या तुलनेत आदिवासी समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असून त्यातूनही महिलांमध्ये अत्यल्प साक्षरता असल्याचे आढळून येते. आदिवासी महिलांचे साक्षरता प्रमाण वाढावे म्हणुन महाराष्ट्र शासन विविध योजना राबवित आहेत.

१. **शाळेत शिकणाऱ्या आदिवासी मुलींना उपस्थिती भत्ता** - आदिवासी विद्यार्थिनींचे गळतीचे प्रमाण अधिक असल्याने ते कमी करण्यासाठी विद्यार्थिनींना शाळेत उपस्थित राहण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत शिकत असलेल्या मुलींना प्रत्येकी दर दिवशी रुपये १/- या प्रमाणे उपस्थिती भत्ता दिला जातो. इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंत शिकत असलेल्या आदिवासी मुलींना त्या वर्षात किमान ७०% उपस्थिती असल्यास दरमहा रुपये ५०/- तर इयत्ता ८ वी ते १० वी शिकणाऱ्या विद्यार्थिनींना रुपये १००/- शिष्यवृत्ती दिली जाते.

२. **शासकीय व अनुदानीत आश्रमशाळा सुरू करणे** - आदिवासींची सामाजिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन आदिवासींमध्ये शैक्षणिक प्रगती व्हावी यासाठी शासनाने सन १९५६ पासून अनुदानीत व १९७२-७३ सालापासून अनुक्रमे अनुदानित व शासकीय आश्रमशाळा चालविल्या आहेत. या शाळांमध्ये आदिवासी मुलामुलींना मोफत निवासाची व शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाने हाती घेतलेले विविध शैक्षणिक कार्यक्रम लक्षात घेता किती आदिवासी महिलांना किमान साक्षर होणे शक्य झाले. आदिवासी स्त्रिया या योजनेचा उपयोग करुन घेऊ शकल्या का, नसल्यास त्याची कोणती कारणे असावीत या उद्देशाने मूल्यमापन पाहणी करुन पुढील माहिती घेण्यात आली.

**आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती**

बेंच मार्क सर्व्हेक्षण १९९६-९७ नुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील एकूण १६,७९,१४२ आदिवासी महिलांपैकी, ३,७१,२२० (२२.१०%) आदिवासी महिला साक्षर आहेत.

भारतीय जनगणना २००१ नुसार भारताच्या एकूण ४,१६,८५,४११ आदिवासी महिलांपैकी, १,१८,२२,२१६ (२८.३६%) आदिवासी महिला साक्षर आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या एकूण ४२,२९,५२२ आदिवासी महिलापैकी १४,९५,९१८ (३५.३६%) आदिवासी महिला साक्षर आहेत.

मूल्यमापन पाहणी मध्ये मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केले असता तक्ता क्र. ३.२.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे असे लक्षात येते की आदिवासी महिलां मध्ये निरक्षर महिला ६४ टक्के आहेत व साक्षर महिलांचे प्रमाण ३६ टक्के आहे. शिक्षण घेतलेल्या महिलांमध्ये पहिली ते पाचवी पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या महिलांचे प्रमाण २० टक्के आहे तर सहावी ते दहावी पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या महिलांचे प्रमाण केवळ १३ टक्के असून दहावीच्या पुढे शिक्षण घेतलेल्या महिला फक्त ३ टक्के आहेत. पाचवी नंतर शाळा सोडल्याचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून येते.

**तक्ता क्र ३.२.१**

| अ.क्र. | शैक्षणिक स्थिती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पहिली ते पाचवी | २८ | २० |
| २. | सहावी ते दहावी | १८ | १३ |
| ३. | अकरावी ते बारावी | ०४ | ३ |
| ४. | निरक्षर | ९० | ६४ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

**मुलींना शिकविण्याची पध्दत**

आदिवासी समाजात मुलींना शिक्षण घेण्यासाठी कोणताही सामाजिक दबाव नाही वा आडकाठी घेतली जात नाही. मुलीना वेगळी वागणुक दिली जात नाही हे आपण मागील प्रकरण सामाजिक दर्जा या मध्ये पाहिलेले आहेच. तक्ता क्र. ३.२.२ मधील संकलित माहितीचे अवलोकन

केल्यास ८८ टक्के कुटूंबांनी दिलेल्या माहिती नुसार मुलींना शिकविण्याची पध्दत आहे. तरीही आदिवासी महिलां मध्ये अशिक्षित महिलांचे प्रमाण ६४ टक्के आहे व प्राथमिक शिक्षण देखिल केवळ २० टक्के महिलांनीच घेतलेले आहे.

**तक्ता क्र ३.२.२**

| अ.क्र. | मुलींना शिकविण्याची पध्दत | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आहे | १२३ | ८८ |
| २. | नाही | १७ | १२ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

**शाळा अर्धवट सोडल्याची कारणे**

आदिवासी समाजात मुलींना शिक्षण घेण्यासाठी कोणतेही बंधन नाही परंतु त्यांना दैनंदिन जीवनाशी झगडताना आर्थिक व कौटुंबिक अडचणी येत असल्याचे आढळते. तक्ता क्र ३.२.३ अवलोकन केले असता त्यांना येणाऱ्या अडचणी निदर्शनास येतात. त्यांच्यासाठी मोफत शिक्षणाची सोय असली तरीही घरातील एक कमावत्या सदस्याने अर्थाजन करण्याऐवजी शाळेत शिक्षण घेण्यासाठी वेळ देणे त्यांना अडचणीचे होते. शिक्षण न घेण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे पूर्ण लक्ष घरकाम व अर्थाजनातच असते.

**तक्ता क्र ३.२.३**

| अ.क्र. | शाळा अर्धवट सोडल्याची कारणे | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आर्थिक | १० | २० |
| २. | घराच्यांच्या सांगण्यावरून | ७ | १४ |
| ३. | लग्न झाल्यामुळे | ७ | १४ |
| ४. | नापास झाल्यामुळे | ७ | १४ |
| ५. | सोय नसल्यामुळे | ३ | ६ |
| ६. | घरकामामुळे | १४ | २८ |
| ७. | आजारी असल्याने | २ | ४ |
| | **बेरीज** | ५० | १०० |
| ९. | निरक्षर | ९० | --- |
| | **एकूण** | **१४०** | **निरंक** |

**शिक्षण घेतलेल्या संस्थेचा प्रकार**

शासनाने आदिवासी करिता स्वतंत्र शाळा सुरू करण्या आधीपासून जिल्हा परिषदेच्या शाळा अस्तित्वात आहेत. जिल्हा परिषद शाळांमधूनही आदिवासी मुली मोठया प्रमाणात शिक्षण घेत असल्याचे प्राप्त माहिती वरुन लक्षात येते. परंतु शिक्षण पूर्ण करण्यासाठी कौटुंबिक व आर्थिक अडचाणीवंर मात करुन शिक्षणासाठी वेळ देणे, एवढे शिक्षणाचे महत्व त्यांना अद्याप पटलेले आहे असे दिसून येत नाही.

तक्ता क्र. ३.२.४ मधील संकलित माहिती नुसार ३६ टक्के शिक्षित महिलांमधील २४ टक्के महिला जिल्हापरिषदेच्या शाळेत शिकलेल्या आहेत, तर ९ टक्के शासकीय आश्रम शाळेत व केवळ ३ टक्के खाजगी महाविद्यालयात शिकलेल्या आहेत.

**तक्ता क्र ३.२.४**

| अ.क्र. | शिक्षण संस्थेचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | जि.प. शाळा. | ३३ | २४ |
| २. | शासकीय आश्रम शाळा | १३ | ९ |
| ३. | खाजगी महाविद्यालय | ०४ | ३ |
| | **बेरीज** | **५०** | **३६** |
| ४. | शिक्षण घेतलेले नाही | ९० | ६४ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

## सेवा योजना कार्ड काढणे

आदिवासी महिलांशी चर्चा केली असता असे आढळले की ९९ टक्के आदिवासी महिलांनी सेवा योजन कार्ड काढलेले नाही कारण सेवायोजन कार्ड फक्त शिकलेल्या लोकांनाच मिळते असे नाही तर निरक्षर लोकांना सुध्दा मिळते याची माहिती आदिवासी महिलांना नाही.

**तक्ता क्र ३.२.५**

| अ.क्र. | सेवा योजन कार्ड | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आहे | ०२ | १ |
| २. | नाही | १३८ | ९९ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

## जमातीचे प्रमाणपत्र प्राप्त करणे

तक्ता क्र. ३.२.६ चे अवलोकन केले असता असे दिसते की २९ टक्के आदिवासी महिलांनी जमातीचे प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे. प्रश्नावली भरुन घेणाऱ्यांशी चर्चा करतांना त्यांनी सांगितले की आदिवासींसाठी असलेल्या योजनांचा फायदा घेण्यासाठी उदाहरणार्थ महिला बचत गट किंवा ग्राम पंचायती मध्ये त्यांना सदस्यत्व मिळण्यासाठी, आरक्षीत मतदारसंघामध्ये आरक्षीत जागेवर निवडणूक लढविण्यासाठी, जमातीचे प्रमाणपत्र प्राप्त केले असल्याचे नमूद केले.

**तक्ता क्र ३.२.६**

| अ.क्र. | जमातीचे प्रमाणपत्र | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अप्राप्त | ९९ | ७१ |
| २. | प्राप्त | ४१ | २९ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

* * *

| प्रकरण ३.३ | आरोग्य विषयक स्तर |
|---|---|

या प्रकरणात आदिवासी महिलांचे आरोग्य विषयक स्तर काय आहे, हे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. आजारी पडल्यावर आदिवासी महिलां दवाखान्यात जाऊन औषधोपचार घेतात काय, किंवा भगता कडे जाऊन झाडफूस करुन उपचार करुन घेतात? आपले आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी व आपल्या मुलांचे आरोग्य सुस्थितीत ठेवण्यासाठी त्यांनी कुटुंब नियोजन केले आहे काय? गर्भ अवस्थेपासून प्रसुती पर्यंत व प्रसुतीनंतर वाढणाऱ्या अर्भकाची काळजी घेण्यासाठी उपलब्ध सुविधांचा उपयोग करुन घेतला जातो का? अशा सर्व मुद्यांच्या संदर्भात आदिवासी महिलांची प्रतिक्रीया विचारात घेऊन मुल्यमापन पाहणी व्दारे एकत्रित केलेल्या माहितीचे विश्लेषण पुढे मांडण्यात येत आहे.

**विवाहाचे वय**

**तक्ता क्र. ३.३.१**

| अन.क्र. | लग्नाच्या वेळचे वय | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १० ते १४ वर्ष | ०९ | ०६.५ |
| २. | १५ ते १७ वर्ष | ५६ | ४०.० |
| ३. | १८ ते २० वर्ष | ५७ | ४०.७ |
| ४. | २१ ते २४ वर्ष | ०६ | ०४.२ |
| ५. | अविवाहित | ०३ | ०२.१ |
| ६. | माहित नाही | ०९ | ०६.५ |
| | **एकूण** | **१४०** | **१००.००** |

तक्ता क्र. ३.३.१ मधील संकलित माहितीवरुन १५ ते १७ वर्षे या वयोगटात ४०% आणि १८ ते २० वर्षे या वयोगटात ४०.७ % स्त्रियांचा विवाह झालेला आहे. याप्रमाणे ८० टक्क्याहून जास्त आदिवासी मुलींचे विवाह वय वर्षे २० च्या आत झालेले आढळतात. २० व्या वर्षानंतर विवाह झालेल्या स्त्रियांची संख्या केवळ ४.२ % आहे.

आदिवासी महिलांच्या लग्नाच्या वेळचे वय विचारात घेता असे लक्षात येते की वय वर्षे १० च्या आधीपासूनच मुलींचे लग्न ठरविण्याचे प्रयत्न केले जातात. बहुतांशी लग्न १५ ते २० याच वयोगटात झालेली आहेत. लहान वयातच लग्नाचा विचार सुरू झाल्यामुळे अगदी ६ व्या वर्षी शाळेत घातले तरी जेमतेम चार वर्षाचे शिक्षण होते. नंतर घरकाम व हळूहळू शेतीकाम तिच्यावर सोपविले जाते. इतकेच नव्हे तर याच काळात लग्नासाठी प्रयत्नही केले जातात व लग्नही लावून दिले जाते. लवकर लग्न झाल्यामुळे प्रजनन काळाचा अवधी वाढतो. लहान वयातील प्रजनन, दोन मुलांमधील अंतर कमी यामुळे संतती सुस्थितीत जन्माला येईलच असे नाही. गर्भपात होणे, अधु, मृत संतती जन्माला येणे असे प्रकार घडतात. यामुळे मातेच्या आरोग्यावर दु:परिणाम होत जातो. वयाने लहान व संख्येने जास्त असलेल्या मुलांच्या संगोपनात मातेला स्वत:च्या आरोग्याची काळजी घेणे शक्य होत नाही. या सर्व प्रकारामुळे मातेला तिचे आरोग्य संभाळणे जिकीरीचे होऊन बसते.

लवकर लग्न केल्यामुळे मातृत्व लवकर येते. कमी अंतराने व वारंवार येणाऱ्या प्रसव अवस्थेत मातेच्या जिवालाही धोका निर्माण होण्याची शक्यता वाढते. इतकेच नव्हे तर मातृत्वाच्या कामातच गुंतल्यामुळे निरक्षरतेचे प्रमाण जास्त आढळून येते. [प्रकरण-शैक्षणिक, तक्ता क्र.(३.२.१)] अशा पार्श्वभूमीमुळे शारीरिक कष्टाचे काम करण्यास शरीर साथ देत नाही. तसेच निरक्षरतेमुळे किंवा पुरेसे शिक्षण घेता न आल्याने मानसिक श्रमाव्दारे उत्पन्न मिळवू शकत नाही. परिणामी अल्प-रोजगार, दारिद्रय व ओघानेच उपासमार त्यांच्या वाटयाला येते. लहान वयात माता झाल्यास माता व बालकांच्या जीवालाही धोका निर्माण होऊ शकतो, याची जाणीव आदिवासी महिलेस नाही.

शारीरिक दृष्टया व सुप्रजनन शास्त्राच्या दृष्टीने योग्य वेळ विचारात घेऊन कायद्याने मुलीच्या लग्नाचे कमीत कमी वय १८ वर्ष ठरविलेले आहे. परंतु आजही आदिवासी समाजात या गोष्टीला फारसे महत्व दिले जात नाही व वय वर्षे १८ च्या आतच मुलीचे लग्न होऊन ती माताही होते.

### उपचार घेण्याची पध्दत

**तक्ता क्र. ३.३.२**

| अ.क्र. | उपचाराचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | दवाखाना | १११ | ७९ |
| २. | भगत | ० | ० |
| ३. | दवाखाना / भगत | २९ | २१ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र. ३.३.२ मधील माहितीप्रमाणे ७९ % आदिवासी महिला आजारी पडल्यानंतर दवाखान्यात उपचार घेतात व केवळ २१ % आदिवासी महिला आजारी पडल्यानंतर दवाखाना व भगत यांचेकडून उपचार घेतात. निव्वळ भगत यांचेकडून अंगारे धुपारे याव्दारे उपचार घेतलेल्या महिला आढळलेल्या नाहीत.

बेंचमार्क सर्व्हेक्षण १९९९ ची मालिका क्र. १ मधील सांख्यिकी माहितीनुसार दवाखान्यातून औषोधोपचार घेणाऱ्या आदिवासींची संख्या ९८.७९ आहे. आदिवासींना औषोधोपचार घेता यावेत यासाठी शासनामार्फत, जिल्हापरिषदांमार्फत व विविध संस्थांमार्फत दवाखान्यांची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आजारी पडल्यावर भगताकडून उपचार घेऊन काही फायदा होणार नाही, म्हणून दवाखान्यात गेलें पाहिजे हा विचार आदिवासी महिलांमध्ये जोपासू लागला आहे. हा अतिशय चांगला बदल या मूल्यमापन पाहणीत दिसून येत आहे.

### कुटुंब नियोजन

**तक्ता क्र. ३.३.३**

| अ.क्र. | मुलांची संख्या | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | एक ही नाही | १३ | १० |
| २. | १ ते३ मुले | ५८ | ४१ |
| ३. | ४ पेक्षा अधिक | ६९ | ४९ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र. ३.३.३ मधील संकलित माहिती प्रमाणे ४ पेक्षा जास्त मुले असलेल्या महिलांची संख्या जास्त आहे.

**तक्ता क्र. ३.३.४**

| अ.क्र. | दोन मुलांमध्ये अंतर (वर्षांमध्ये) | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ - १.१/२ वर्ष | २५ | १८ |
| २. | १.१/२ ते २ वर्ष | ५३ | ३८ |
| ३. | २ वर्षांच्या पुढे | ३५ | २५ |
| ४. | एकच मुल / अविवाहित/ मुले नाही | २७ | १९ |
| | **एकुण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र. ३.३.४ या तक्त्यातील संकलित माहितीप्रमाणे दोन मुलांमधील अंतर दोन वर्षा पर्यंत असणाऱ्या माता ५६% आहेत.

**तक्ता क्र. ३.३.५**

| अ.क्र. | कुटुंब नियोजन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | केलेले आहे | ७८ | ५६ |
| २. | केलेले नाही | ६२ | ४४ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र. ३.३.३, तक्ता क्र. ३.३.४ आणि तक्ता क्र.३.३.५ यांचे एकत्रित निरीक्षण केल्यास असे लक्षात येते की ३ मुले असलेल्या ४१% महिला आहेत. ४९% महिलांना ४ पेक्षा अधिक मुले झालेली आहेत. १८% महिलांच्या दोन मुलांमधील अंतर १.१/२ वर्ष आहे ३८% महिलांच्या दोन मुलांमधील अंतर २ वर्ष आहे. ५६% महिलांनी कुटुंब नियोजन केलेले आहे.

सर्व्हेक्षणाव्दारे मिळालेल्या माहितीनुसार ४ पेक्षा जास्त मुले असलेल्या महिलांची संख्या जास्त आहेच परंतु कुटुंब नियोजन न केलेल्या मातांची संख्याही ४४% आहे. दोन मुलांमधील कमीत कमी अंतर १ वर्ष आहे आणि दोन वर्षापर्यंत अंतर असणाऱ्या मातांची संख्याही अधीक आहे.

कमी वयातील व संख्येने अधिक असलेल्या मुलांच्या संगोपनात मातांना सर्वाधिक वेळ घालवावा लागतो. वयाने लहानच असलेल्या मोठ्या मुलांकडे आवश्यक तेवढे लक्ष पुरविणे शक्य होत नाही.

मुलांची संख्या वाढू नये तसेच दोन मुलांमधील अंतर वाढविण्यासाठी कुटुंब नियोजनाचा उपयोग केला पाहीजे ही मनोवृत्ती अद्याप पाहिजे त्या प्रमाणात आदिवासी महिलांमध्ये वाढलेली दिसत नाही.

दोन मुलांमधील अंतर वाढविले तर मुलांचे संगोपन अधिक चांगल्याप्रकारे करता येईल. सशक्त मुलांना जन्म देण्यास मदत होईल. आर्थिक बोजा वाढू नये या दृष्टीने मुलांची संख्या मर्यादित ठेवण्यासाठी तसेच दोन मुलांमधील अंतर वाढविणेसाठी कुटुंब नियोजनाचा वापर करणे आवश्यक आहे. कुटुंब नियोजन म्हणजे मुले बंद करण्याची शस्त्रक्रिया एवढाच अर्थ या महिलांना अभिप्रेत असावा. देवाची देणगी म्हणून मूल स्वीकारत राहणे योग्य नाही याची जाणीव अद्यापही अधिक प्रमाणात होणे आवश्यक आहे.

**गर्भ अवस्था - उपचार व विश्रांती**

गर्भावस्थेत व प्रसूती नंतरही महिलांना औषोधोपचार व विश्रांतीची आवश्यकता असते यासाठी शासनाने आदिवासी भागात दवाखान्यांची सोय केली. वेळ पडल्यास पाडयावरच असलेल्या अंगणवाडी सेविका / प्रशिक्षित दायी यांचीही मदत घेता येऊ शकते. त्यांना घरी बोलावता येते. या काळात शारिरीक श्रम करावे लागू नयेत, विश्रांती घेता यावी, पोटभर पौष्टिक अन्न खाण्यास मिळावे, यासाठी आदिवासी मातां करिता मातृत्व अनुदानाची योजना शासन राबवित आहे.

**तक्ता क्र. ३.३.६**

| अ.क्र. | गर्भ अवस्थेपासून प्रसुती पर्यंत दवाखान्यात तपासणी | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | केली आहे | ५६ | ४३.४२ |
| २. | केली नाही | ७३ | ५६.५८ |
| | **बेरीज** | **१२९** | **१००** |
| ३. | अविवाहित /मुले झाली नाहीत | ११ | निरंक |
| | **एकूण** | **१४०** | **निरंक** |

तक्ता क्र. ३.३.६ मधील संकलित माहिती प्रमाणे गर्भ अवस्थेपासून प्रसुती पर्यंत दवाखान्यात तपासणी केलेल्या महिलांचे प्रमाण ४३.४२ % आहे. उर्वरित ५६.५८ % महिलांनी अशी तपासणी केलेली नाही.

**तक्ता क्र.३.३.७**

| अ.क्र. | प्रसुतीचे ठिकाण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | घरी | ११९ | ९२.२५ |
| २. | दवाखाना / घर | १० | ७.७५ |
| | **बेरीज** | **१२९** | **१०० %** |
| ३. | अविवाहीत/मुले झाली नाहीत | ११ | निरंक |
| | **एकूण** | **१४०** | **निरंक** |

तक्ता क्र.३.३.७ मधील संकलित माहिती प्रमाणे ९२.२५ % स्त्रियांची प्रसूती घरी झाली आहे. उर्वरित ७.७५ % स्त्रियांच्या बाबतीतही काही वेळेस घरीच प्रसुती झाल्याची नोंद आहे.

प्रसव वेळेचा अंदाज घेऊन ८ दिवस आधी दवाखान्यात दाखल होण्याची सुविधा पांडयावरील दवाखान्यात आहे. परंतु, प्रसव वेळे पर्यंत रोजगारीचे काम करणाऱ्या माता ८ दिवस दवाखान्यात झोपून राहण्याचा विचार स्विकारीत नाहीत. यासाठी त्यांची मानसीक तयारी नाही. मातेची प्रसव वेळ जवळ आलेली असतांना तिला उचलून दवाखान्यात पर्यंत डोंगर उतरुन चढून घेऊन जाण्यापेक्षा घरातच प्रसुती करणे त्यांना जास्त सोयीचे वाटते.

**तक्ता क्र. ३.३.८**

| अ.क्र. | अंगणवाडी सेविका/ दायी यांचेकडून मदत | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | घेतली आहे | ५५ | ४३ |
| २. | घेतली नाही | ७४ | ५७ |
| | **बेरीज** | **१२९** | **१००** |
| ३. | मुले झालेली नाहीत | ११ | ०८ |
| | **एकूण** | **१४०** | **निरंक** |

तक्ता क्र. ३.३.८ तक्त्यात संकलित माहिती प्रमाणे ३९% आदिवासी महिलांनी अंगणवाडी सेविका, दायी यांचेकडून मदत घेतलेली आहे. परंतु ५३ % आदिवासी महिलांनी अशी मदत घेतलेली नसल्याची माहिती मिळते.

**तक्ता क्र. ३.३.९**

| अ.क्र. | प्रसुती नंतरची विश्रांती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते १५ दिवस | ५९ | ४६ |
| २. | १६ ते ३० दिवस | २० | १५ |
| ३. | ३० दिवसांपेक्षा अधिक दिवस | ५० | ३९ |
| | **बेरीज** | **१२९** | **१००** |
| ४. | अविवाहित /मुले झाली नाहीत | ११ | निरंक |
| | **एकूण** | **१४०** | **निरंक** |

तक्ता क्र. ३.३.९ संकलित माहिती नुसार प्रसुतीनंतर १५ दिवस विश्रांती मिळालेल्या ४५% महिला आहेत, ३० दिवस विश्रांती मिळालेल्या १५% आदिवासी महिलां म्हणजे एकूण ६०% महिलांना जास्तीत जास्त केवळ ३० दिवस विश्रांती मिळालेली आहे.

उपरोक्त तक्त्यातील [तक्ता क्र.३.३.६, क्र. ३.३.७ व क्र.३.३.८] मुल्यमापन पाहणीव्दारे उपलब्ध झालेली आकडेवारी पाहिल्यास गर्भावस्थेपासून प्रसूतीपर्यंत दवाखान्यात तपासणी करून घेणाऱ्या आदिवासी मातांची संख्या ४३ % आहे. परंतु दवाखान्यात प्रसूती होणाऱ्या माता फक्त

८% आहेत. ९२% आदिवासी माता घरीच प्रसुत झालेल्या आहेत. घरातील प्रसूतिसाठी अंगणवाडी सेविका किंवा प्रशिक्षित दायीची मदत घेणाऱ्या आदिवासी माता फक्त ४३% आहेत. वैद्यकशास्त्रानुसार प्रसूतीनंतर शरीरप्रकृति पुर्ववत होण्यासाठी सर्वसाधारणपणे कमीत कमी ९० दिवसांची विश्रांती आवश्यक असते. परंतु सर्व्हेक्षणात मिळालेल्या माहितीनुसार केवळ १५ दिवस विश्रांती घेणाऱ्या ४६% माता आहेत तर ३० दिवसांपक्षा कमी विश्रांती मिळालेल्या महिलांची संख्या ६१% आहे. मातृत्व योजनेचा लाभ घेणाऱ्या आदिवासी माता देखील केवळ २१% आहेत. [पहावे तक्ता क्र. ३.३.१०]

सर्व्हेक्षणाच्या आकडेवारीवरून शासनाने केलेल्या सोयी तसेच उपलब्ध करून दिलेल्या योजनांचा लाभ घेणाऱ्या मातांची संख्या कमी अढळून आलेली आहे. तसेच बेंचमार्क सर्व्हेक्षण १९९९ मालीका क्र. १ च्या आकडेवारी मध्येही प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीसाठी दवाखान्यात जाणाऱ्या आदिवासी महिलांची संख्या अनुक्रमे केवळ १५% व १३% आहे. अशी परिस्थिती असण्यामागे वैचारिक बदलाचा अभाव हे कारण काही अंशी असू शकते. गर्भपात होणे, मृत अपत्य जन्माला येणे, तसेच जन्माला आलेली अशक्त अपत्यांचा मृत्यु होणे यामुळे हवालदिल झालेली माता या घडणाऱ्या सर्व गोष्टीची कारणे समजू शकत नाही आणि दवाखाना, अंगणवाडी सेविका, प्रशिक्षित दायी यांची मदत घेतांना बिचकते.

**मातृत्व अनुदान योजना**

अतिसंवेदनशिल जिल्ह्यात अर्थातच आदिवासी उपयोजना क्षेत्रातील माता व बाल संगोपनासाठी आरोग्य विषयक उपाययोजनेत मातृत्व अनुदान योजना शासन राबवित आहे. गर्भवती मातांना कष्टाचे काम करणे धोकादायक असते यासाठी, प्रसूतीपूर्व २ महिन्याच्या कालावधीत कष्टाच्या कामामुळे गर्भपाताची शक्यता असते. या संवेदनशील कालावधीत त्याची प्रसूतीपूर्व नोंदणी व तपासणी योग्यवेळी नियमितपणे पुर्नतपासणी करणे यासाठी आदिवासी स्त्रियांना उद्युक्त करण्याकरीता प्रोत्साहनपर प्रसुतीपूर्व ३ महिने व प्रसवोत्तर १ महिना अशा १६ आठवडयांकरीता बाळंतपणासाठी प्रति गर्भवती महिलेस एकूण ८०० रूपये (४०० रूपये रोखीने व ४०० रुपये औषधाच्या स्वरूपात) देण्यात येतात.

**तक्ता क्र. ३.३.१०**

| अ.क्र. | मातृत्व अनुदान योजना | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | लाभ घेतला | ३० | २१ |
| २. | लाभ घेतला नाही | ११० | ७९ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र. ३.३.१० मधील संकलित माहिती मध्ये केवळ २१% आदिवासी महिलांनी मातृत्व अनुदान योजनेचा लाभ घेतला असल्याचे दिसते. मातृत्व अनुदान योजना ही एक अतिशय चांगली योजना आहे व तिचा प्रचार व प्रसार व्यापक प्रमाणात होण्याची गरज आहे.

**सर्वसाधारण शारिरीक स्थिती**

**तक्ता क्र. ३.३.११**

| अ.क्र. | आदिवासी महिलांना शारिरीक व्याधी | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आहे | ११ | ८ |
| २. | नाही | १२९ | ९२ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र. ३.३.११ मध्ये संकलित माहिती प्रमाणे केवळ ८% आदिवासी महिलांना शारिरीक व्याधी आहे. ९२% आदिवासी महिला व्याधी मुक्त आहेत.

तक्ता क्र. ३.३.१ ते तक्ता क्र. ३.३.१० [प्रकरण-आरोग्य विषयक स्तर] व ३.४.१ [प्रकरण-आर्थिक स्थिती] यांचा एकत्रितपणे विचार केल्यास आदिवासी महिला या अनेक शारीरिक त्रासातुन जात असल्याचे अढळून येते. मात्र तक्ता क्र. ३.३.११ याचा स्वतंत्रपणे विचार केल्यास असे दिसून येते की ९२% आदिवासी महिला या व्याधी मुक्त आहेत. हा विरोधाभास का? याची कारणमिमांसा तपासून पाहिली असता असे आढळून येते की आदिवासींचे जीवन निसर्ग सानिध्यात व्यतीत होते त्यामुळे त्यांना सतत आणि भरपूर ऑक्सिजन असलेली मोकळी व प्रदुषण विरहित हवा मिळते. दिवसभर शारिरीक तणावाखाली वावरून सुध्दा संध्याकाळी ते एकत्र येतात, स्वतः

गाणी म्हणतात, स्वतः तयार केलेली वाद्ये वाजवतात, नृत्य करतात आणि दिवसभराचा शीण घालवतात. म्हणूनच शारिरीक व मानसिक स्वास्थ्य चांगले राहण्यास मदत होते. आजचा दिवस संपला की, उद्याची काळजी करण्याची मनोवृत्ती नाही. ते तणावमुक्त (Stress free) आयुष्य जगतात. अर्थात, आहे त्यात समाधानी !

* * *

| प्रकरण ३.४ | आर्थिक स्थिती |
|---|---|

अर्थाजनासाठी किती महिला मजुरी करतात, नोकरी करतात, व्यवसाय करतात, इत्यादि दृष्टीकोनातून आदिवासी महिलांचा अर्थाजनातील सहभाग किती व कसा आहे याची माहिती सर्वेक्षणाव्दारे घेण्यात आली. त्याचे विश्लेषण पुढे देण्यात येत आहे.

**अर्थार्जनात महिलांचा सहभाग**

**तक्ता क्र. ३.४.१**

| अ.क्र. | अर्थाजनाचे स्वरूप | अर्थाजन करणाऱ्या महिला | |
|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी |
| १. | मजुरी | ४९ | ३५ |
| २. | नोकरी | ४ | २.८५ |
| ३. | स्वत:ची शेती करतात | ३१ | २२.१५ |
| ४. | स्वत:ची शेती करतात व मजुरी | ४८ | ३४.२९ |
| ५. | व्यवसाय | २ | १.४२ |
| ६ | काहीच अर्थाजन न करणे | ६ | ४.२९ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र. ३.४.१ प्रमाणे बहुतांशी महिला कमावत्या असल्याची माहिती प्राप्त होते. मजुरी करून स्वत:च्या शेतात राबणाऱ्या स्त्रियांची संख्या जास्त आहे. परंतु तक्ता क्र. ३.४.५ प्रमाणे ५८% आदिवासी कुटुंबे दारिद्रय रेषेखाली आहेत. महिलांनाही आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी अर्थाजन करावे लागते. मजुरी करणाऱ्या व स्वत:ची शेती करुन मजुरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या अधिक आढळून आलेली आहे. निरक्षर असल्यामुळे अर्थाजनासाठी मजुरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या अधिक प्रमाणात आढळते.

**तक्ता क्र. ३.४.२**

| अ.क्र | अर्थाजनाचा मार्ग | अर्थाजन करणाऱ्या महिला वयोगट | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **१६ ते ३५** | **३६ ते ५०** | **५० पेक्षा जास्त** | **एकूण** | **टक्केवारी** |
| १. | मजुरी | ३२ | १६ | १ | ४९ | ३५ |
| २. | नोकरी | १ | ३ | --- | ४ | ३ |
| ३. | स्वत:ची शेती करतात | १६ | ११ | ४ | ३१ | २२ |
| ४. | स्वत:ची शेती व मजुरी करतात | २७ | १७ | ४ | ४८ | ३४ |
| ५. | व्यवसाय | २ | --- | --- | २ | २ |
| ६ | काहीच अर्थाजन न करणे | १ | ३ | २ | ६ | ४ |
| ७ | एकूण स्त्रिया | ७९ | ५० | ११ | १४० | १०० |
| | **टक्केवारी** | **५६.४३** | **३५.७२** | **७.८५** | | **१००** |

तक्ता क्र. ३.४.२ मधील वयोगटानुसार अर्थाजन करणाऱ्या महिलांची संकलीत माहिती विचारात घेतल्यास वाढत्या वयानुसार अर्थाजन करणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी होत गेलेली दिसते. बाल वयापासून शारिरीक कष्ट, लहानवयातील लग्न, निकृष्ट दर्जाचे व अर्धपोटी अन्न इत्यादि मुळे शरीराचे योग्य पोषण न झाल्याने वाढलेल्या वयात शरीर व्याधियुक्त नसले तरी (प्रकरण ३ - आरोग्य विषसक स्तर, तक्ता क्र. ३.३.११ पहावे) कष्टाची कामे करण्यास शरीर साथ देत नाही असे आढळून आले.

**तक्ता क्र. ३.४.३**

| अ.क्र. | एक दिवसाचा रोजगार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | रुपये २० | २० | १४.२८ |
| २. | रुपये २५ ते ३० | ७६ | ५४.३० |
| ३. | रुपये ३५ ते ४० | १३ | ९.२८ |
| ४. | रुपये ४५ ते ५० | ०७ | ५.०० |
| ५. | रुपये ५० ते ७० | ०३ | २.१४ |
| ६. | मजुरीला जात नाहीत | २१ | १५.०० |
| | **एकूण** | **१४०** | **१०० %** |

तक्ता क्र. ३.४.३ मधील संकलित माहिती नुसार जवळजवळ ५५ % स्त्रियांना एक दिवसाची मजुरी २५ ते ३० रूपये मिळते, तर केवळ ३% स्त्रियांना ५० रूपयांपेक्षा जास्त मजुरी मिळते. महिलांना कष्टाच्या तुलनेत मिळणारी मजुरी अतिशय कमी आहे.

किमान वेतन कायदा, १९४८ या प्रमाणे गावात व नगरपरिषदेच्या हद्दीत अकुशल मजुरास किमान वेतन रूपये १४०/- मिळते. त्या तुलनेत आदिवासी महिलेस मिळणारी रोजंदारी अत्यंत तुटपुंजी आहे.

**तक्ता क्र. ३.४.४**

| अ.क्र. | पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना मिळणारा रोजगार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जास्त | --- | ---- |
| २ | कमी | ९० | ६४.२८ |
| ३ | समान | ८ | ०५.७२ |
| ४ | उत्तर नाही | ४२ | ३०.०० |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र.३.४.४ मधील संकलित माहिती नुसार ६४ % पेक्षा जास्त स्त्रियांना पुरूषांच्या तुलनेत कमी रोजगार मिळतो. आदिवासी महिलांना मिळणारी रोजंदारी किमान वेतन कायदा १९४८ च्या तुलनेत व त्यांच्या सोबत काम करणाऱ्या पुरूषांच्या तुलनेतही अत्यंत कमी असल्याने, त्या सतत मानसिक दबावाखाली वावरत असतात. त्या कमावत्या असल्यातरी ८३% महिला त्यांच्या कुटुंबावर अवलंबून असल्याचे तक्ता क्र. ३.४.६ मधील माहितीमध्ये आढळते.

## दारिद्र्य रेषेखालील कुटुंब व महिलाचे कुटुंबावर अवलंबन

**तक्ता क्र. ३.४.५**

| अ.क्र. | महिलांचे कुटुंब | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | दारिद्र्य रेषेखाली आहे | ८१ | ५८ |
| २. | दारिद्र्य रेषेखाली नाही | ५९ | ४२ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

५८% महिलांची कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली आहेत असे तक्ता क्र. ३.४.५ मधील संकलित माहितीवरून दिसते. अपत्य संख्या जास्त परिणामी वारसाहक्काने असलेल्या जमीनीच्या वाटणी मध्ये जमीनीचे लहान लहान तुकडे वाटयाला आल्याने बरीचशी कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली येण्यास कारणीभूत ठरली. बऱ्याचशा आदिवासींच्या जमीनी त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन कर्ज वसूली पोटी बिगर आदिवासींनी बळकावल्या, त्यामुळे भूमीहिन झालेली आदिवासी कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली गेली आहेत.

**तक्ता क्र. ३.४.६**

| अ.क्र. | महिलाचे कुटुंबावर अवलंबन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आहे | ११६ | ८३ |
| २. | नाही | २४ | १७ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र.३.४.६ या तक्त्यातील संकलित माहिती वरून ८३% आदिवासी महिला आर्थिकदृष्टया त्यांच्या कुटुंबावर अवलंबून असल्याचे दिसते. पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना मिळणारी मजुरीची संधी दुय्यम आहे व मजुरीची रक्कमही कमी आहे. परिणामी स्त्रियांना मजुरीचे काम मिळेलच असे नाही व मिळणारी मजुरीची रक्कम पुरूषांना मिळणाऱ्या रकमेच्या तुलनेत कमीच मिळते. परंतु उदरर्निवाहाच्या दृष्टिनेही मिळणारे मजूरीचे पैसे कमी असल्यामुळे, तसेच पुरूषप्रधान संस्कृतिचा पगडा या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणून आदिवासी महिला अर्थाजन करीत असल्यातरीही कुटुंबावर अवलंबून असलेल्या महिलांचे प्रमाण अधिक आहे.

**अर्थार्जनात शासकीय योजनांचा लाभ**

**तक्ता क्र. ३.४.७**

| अ.क्र. | शासकीय योजनांची माहिती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आहे | १८ | १३ |
| २. | नाही | १२२ | ८७ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र. ३.४.७ मधील संकलित माहितीनुसार केवळ १३% आदिवासी महिलांना शासकीय योजनांची माहीती आहे व ८७% महिलांना शासकीय योजनांची माहिती नाही.

**तक्ता क्र. ३.४.८**

| अ.क्र. | शासकीय योजनांचा लाभ | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | घेतला आहे | २५ | १८ |
| २. | घेतला नाही | ११५ | ८२ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र. ३.४.८ मधील संकलित माहितीनुसार केवळ १८% आदिवासी कुटुंबानी शासकीय योजनांचा लाभ घेतला आहे तर ८२% आदिवासी कुटुंबानी शासकीय योजनांचा लाभ घेतलेला नाही असे आढळते. आदिवासीं कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीसाठी शासन अनेक योजना राबवित आहे. त्यातील काही योजनांचा येथे उल्लेख करण्यात येत आहे. आदिवासी जमातीच्या शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप पुरवठा, न्यूक्लिअस बजेट योजना, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना, स्वयंरोजगारासाठी कर्ज पूरवठा योजना (शबरी वित्त व विकास महामंडळ मर्यादित), भारतीय संविधानाच्या २७५ (१) अंतर्गत जिल्हयात वाडी कार्यक्रम राबविणे - केंद्रिय सहाय्य, आदिम जमातीसाठी विकासाच्या योजना- केंद्रिय सहाय्य, मोटर वाहन चालक प्रशिक्षण केंद्र योजना, अनुसूचित जमातीच्या लोकांना घरावरील गवती छपरा ऐवजी मंगलोरी कौले किंवा पन्हाळी पत्रे टाकण्याकरीता अर्थसहाय्य योजना, मागासवर्गीयांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य योजना, खावटी कर्ज योजना, धान्य कोष योजना, इत्यादि अशा विविध शासकीय योजनांची

माहिती खूपच कमी आदिवासी माहिलांना आहे. बहुतांशी महिलांच्या कुटुंबानी आर्थिक उन्नतीसाठी शासकीय योजनांचा लाभ घेतलेला आढळत नाही.

राज्यातील आदिवासी महिलांच्या आर्थिक विकासासाठी स्वयंसहाय्यता बचत गटाची निर्मिती, महिलांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम, महिलांनी केलेल्या उत्पादनासाठी बाजारपेठ व अनुषंगिक आधारसेवा इत्यादि कार्यक्रम महिला आर्थिक विकास महामंडळा **(माविम)** मार्फत राबविण्यात येतात.

स्वयंशासित राज्यकारभार, गावाच्या हाती गावाचा विकास या हेतूने त्रिस्तरीय पंचायत राज्य पध्दतीमधील ग्रामपंचायत व ग्रामसभा यांना घटनात्मक अधिकार दिले गेले आहेत. गावातील ज्येष्ठ नागरीक ग्रामसभेचा अध्यक्ष असतो. गावातील मतदार ग्रामसभेचे सभासद असतात. हे सभासद गावाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने संबंधित गावात घ्यावयाच्या आर्थिक लाभाच्या योजना निवडणे, त्यासाठी आर्थिक तरतूद करणे, योजनांचा लाभा द्यावयाच्या लाभार्थ्याची निवड करणे, या सर्व बाबी ग्रामसभेत ठराव मंजूर करून केले जातात. ग्रामसभांच्या ठरावानुसार ग्रामपंचायत या योजना राबविण्याची कार्यवाही करते व योजनांसाठी प्राप्त तरतूदीच्या झालेल्या योग्य वापराबाबत ग्रामसभा उपयोगिता प्रमाणपत्र (Utilisation Certificate) देते.

* * *

**प्रकरण ३.५**

# राजकीय स्थिती

आदिवासी भागामध्ये पूर्वीपासून खास गाव पंचायती अस्तित्वात आहेत. या पंचायतीव्दारे गावाचा कारभार पाहिला जातो. आदिवासींच्या या स्व:शासनाला धक्का पोहोचू नये यासाठी ७३व्या घटनादुरूस्ती विधेयकाव्दारे "पंचायत (अनुसूचित क्षेत्रास विस्तारीत) कायदा, १९९६" अस्तित्वात आला व त्या आधारे आदिवासी क्षेत्रात असलेल्या गावातील ग्राम सभा बळकट झाल्या. त्रिस्तरीय पंचायत राज पध्दती मध्ये ग्रामसभेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला व गावातील लोकांना गावाच्या विकासामध्ये प्रत्यक्ष व सक्रियपणे सहभागी होण्याचा घटनात्मक अधिकार मिळाला.

पंचायत (अनुसूचित क्षेत्रास विस्तारीत) कायदा, १९९६ यास अनुसरुन महाराष्ट्र राज्याने -- महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींना स्वयं शासन करण्यासंबंधीचे अधिकार प्रदान करणे (राज्याच्या विवक्षित कायद्यांमध्ये सुधारणा) अधिनियम, १९९७ -- या नावांनेअधिनियम प्रसिध्द केला.

या अधिनियमांच्या ठळक वैशिष्ठयांपैकी काही वैशिष्ठये पुढे नमूद करण्यात येत आहेत:-

(१) या विधेयकाव्दारे ग्रामसभेतील प्रत्येक आदिवासी सदस्याला आपल्या परंपरागत रिती-रिवाजाने आणि रूढीने, आपल्या सांस्कृतिक वैशिष्ठयांची ओळख ठेऊन सामुदायिक साधन संपत्तीचे आणि वाद (तंटे) सोडवण्याच्या पारंपारिक पध्दतीचे रक्षण आणि जतन करण्याचा अधिकार राहील.

(२) प्रत्येक खेडयासाठी (गांवासाठी) त्यांच्या ग्रामपातळी वरील निवडणूकासाठीच्या निवडणूक यादीत ज्यांची नावें समाविष्ट आहेत अशा व्यक्तींची मिळून एक ग्राम सभा असेल.

(३) सामाजिक, आर्थिक विकासाबाबत योजना, कार्यक्रम आणि प्रकल्प हे ग्राम पंचायतीने गावपातळीवर अंमलात आणण्यापूर्वी त्यांना ग्राम सभा मान्यता देईल. ग्राम पंचायतीने केलेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र ग्राम सभेत ग्राम पंचायत मान्य करुन घेईल.

(४) ग्राम सभा दारिद्रय निर्मलून व इतर योजनांसाठी पात्र अशा व्यक्तींच्या निवडीबाबत अथवा ओळखी करिता जबाबदार राहील.

(५) दारुबंदी अंमलात आणण्याचा अथवा मादक पदार्थांची विक्री किंवा उपयोग यावर नियंत्रण ठेवणे व निर्बंध घालण्याचा अधिकार ग्राम सभेस असेल.

(६) अनुसूचित क्षेत्रातील जमीनीचे हस्तांतरण रोखण्याचा अधिकार आणि अनुसूचित जमातीच्या व्यक्तींच्या जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरणाचे पुनःस्थापना करण्यासाठी योग्य ती कारवाई करण्याचा अधिकार ग्राम सभेस राहील.

(७) कोणत्याही नावाखाली चालू असलेल्या गाव बाजाराचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार ग्राम सभेस राहील.

(८) अनुसूचित जमातींना दिल्या जाणा-या कर्ज व्यवहारावर नियंत्रण करण्याचा अधिकार ग्राम सभेस राहील.

(९) अनुसूचित जमातीच्या उपयोजनासह सर्व स्थानिक योजनांचे व साधन स्त्रोतांचे नियंत्रण करण्याचा अधिकार ग्राम सभेस राहील.

थोडक्यात ग्रामसभेला गावातील प्रत्येक ग्रामसभेच्या सदस्याचा म्हणजेच गावाचा आर्थिक व भौतिक विकास साधण्यासाठी पूर्वीपेक्षा जास्त अधिकार मिळालेले आहेत. ग्रामपंचायतीमध्ये १/३ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

पंचायत (अनुसूचित क्षेत्रास विस्तारीत) कायदा, १९९६ या अन्वये महाराष्ट्र शासनाने केलेल्या कायद्यास अनुसरून जे अधिकार ग्रामसभेला प्राप्त झालेले आहेत, ते या कायद्या व्दारे प्राप्त अधिकारांचा वापर आदिवासी महिला करतात का? वा त्यांना किमान त्याची जाणीव तरी आहे काय? या पार्श्वभूमीवर आदिवासी महिलांची राजकीय स्थिती व दर्जा काय आहे, अशा दृष्टीकोनातून याची माहिती या मूल्यमापन पाहणी व्दारे घेण्यात आली.

### निवडणूकांमध्ये मतदानाचा हक्क बजावणे

भारत हा लोकशाहीप्रधान देश आहे. केंद्र सरकारपासून ते राज्य सरकारपर्यंत व राज्य सरकारपासून ते जिल्हयातील प्रत्येक गावातील ग्रामपंचायती मध्ये निवडणूकीव्दारे उमेदवारांची

निवड होत असते. भारतीय संविधानाने भारतातील प्रत्येक प्रौढ पुरूष व स्त्रीस कुठलाही जातीचा, रंगाचा, वर्णाचा, भौगोलिक स्थानाचा भेदभाव न करता मतदानाचा हक्क दिलेला आहे. जेव्हा भारतीय जनता मतदानाचा प्राप्त हक्क, आपले मतदान करुन बजावते तेव्हाच लोकशाही आपली पाळेमुळे खोलवर रूजवू शकते आणि म्हणूनच भारतामध्ये आजही लोकशाही टिकून आहे.

ही बाब विचारात घेता आदिवासी महिला ग्रामपंचायतीच्या किंवा लोकसभा व विधान सभेच्या निवडणूकांमध्ये किती भाग घेतात याची माहिती मूल्यमापन अभ्यासाव्दारे घेण्यात आली.

**तक्ता क्र. ३.५.१**

| अ.क्र. | निवडणूकांमध्ये मतदानाचा हक्क बजावणे | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १३२ | ९४ |
| २. | नाही | ८ | ६ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र. ३.५.१ मधील संकलित माहिती नुसार ९४% आदिवासी महिला निवडणुकी मध्ये मतदानाचा हक्क बजावतात केवळ ६% महिला मतदानाचा हक्क बजावत नाहीत. म्हणजेच आदिवासी महिला आपल्या मतदानाच्या हक्काविषयी जागरुक आहेत असे दिसून येते.

**ग्राम पंचायतीतील सदस्यत्व**

महाराष्ट्र राज्यात ग्रामपंचायतीच्या सदस्यांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात ठरविलेली आहे. ग्रामपंचायती मध्ये कमीत कमी १५०० लोकसंख्येमागे ७ सदस्य असतात तर जास्तीत जास्त ७५०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्येस १७ सदस्य असतात.

**तक्ता क्र. ३.५.२**

| अ.क्र. | ग्राम पंचायतीतील सदस्यत्व | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आहे | १८ | १३ |
| २. | नाही | १२२ | ८७ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

या सदस्यांच्या जागेसाठी १/३ जागा महिलांसाठी राखीव असतात. अशा परिस्थितीत तक्ता क्र. ३.५.२ नुसार फक्त १३ टक्के महिलांनी ग्राम पंचायतीतील सदस्यत्व उपभोगलेले आहे अशी माहिती मिळते.

**ग्राम सभेबाबत माहिती**

आदिवासी भागामध्ये पूर्वीपासून खास गावपंचायती अस्तित्वात आहेत. याच खास गावपंचायतीला ग्रामसभेच्या नावाने घटनात्मक दर्जा देण्यात आला. ग्रामसभेच्या माध्यमातून सर्वसाधारण ग्रामीण जनतेला स्थानिक विकासावर नियंत्रण ठेवण्याची, त्याला दिशा देण्याची, नैसर्गिक साधन संपत्तीच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याची, आपल्या बळकावलेल्या जमीनी परत मिळविण्याची व त्या सुरक्षित ठेवण्याची तसेच आदिवासी जमातींना आपल्या चालीरीती, रूढी जोपासण्याची संधी प्राप्त करून देण्यात आलेली आहे. वर्षातून कमीत कमी दोन वेळा तरी ग्रामसभा घेणे आवश्यक आहे अन्यथा सरपंचांना त्यांच्या पदावर राहता येत नाही.

**तक्ता क्र. ३.५.३**

| अ.क्र. | ग्राम सभेबाबत माहिती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आहे | ४४ | ३१ |
| २. | नाही | ९६ | ६९ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

मतदानाचा हक्क बजावण्याबाबतची माहिती ९४% महिलांना आहे. (तक्ता क्र. ३.५.१) त्याचप्रमाणे या ग्राम पंचायतीच्या सर्व मतदारांना ग्रामसभेत उपस्थित राहून आपल्या सूचना मांडता येतात. आपली मतं मांडून गावच्या विकासात सहभागी होता येते. आपल्या गावाचा विकास आपल्याच हातात कसा आहे, याची माहिती मात्र तक्ता क्र. ३.५.३ प्रमाणे ६९% महिलांना नाही असे दिसून येते.

**गावातील सहकारी संस्थे मधील सभासदत्व**

मतदानाचा हक्क बजावणे किंवा मतदान करणे आणि उमेदवार म्हणून स्वतः निवडून येणे, या दोन भिन्न बाबी आहेत. कदाचित आदिवासी महिला सक्रियपणे राजकारणात भाग घेऊ इच्छित नसावी. ही गोष्ट विचारात घेऊन इतर सहकारी क्षेत्रामध्ये आदिवासी महिलांच्या सहभागाची काय स्थिती आहे हे जाणून घेण्यासाठी मूल्यमापन अभ्यासात माहिती घेण्यात आली.

**तक्ता क्र. ३.५.४**

| अ.क्र. | गावातील सहकारी संस्थे- -मधील सभासदत्व | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आहे | १९ | १३ |
| २. | नाही | १२१ | ८७ |
| | **एकूण** | **१४०** | **१००** |

तक्ता क्र. ३.५.४ मधील संकलीत माहिती नुसार केवळ १३% आदिवासी महिला आपल्या गावातील सहकारी संस्थेमध्ये सभासद आहेत व ८७ % आदिवासी महिला सभासद नाहीत. याही क्षेत्रामध्ये त्यांची उदासीनता दिसून आली.

* * *

प्रकरण ४

# शिफारशी

**सामाजिक दर्जा (३.१)**

१. कुटुंबाचा आर्थिक गाडा ओढण्यासाठी दिवस भर शारीरिक कष्ट करणाऱ्या या महिलेला शारीरिक विश्रांतीचीही अत्यंत आवश्यकता आहे. याची जाणीव समाज प्रबोधनातूनच करून देणे आवश्यक आहे. तिला शिक्षण दिले तर शारीरिक कष्टाबरोबर मानसिक श्रमातूनही ती चांगल्या प्रकारे आपल्या कुटुंबाची आर्थिक बाजू सांभाळू शकेल. यासाठी महिलांना शिक्षणाची आवश्यकता आहे.

- **सामाजिक प्रबोधनाची गरज**
- **महिलांना शिक्षणाची आवश्यकता**

**शैक्षणिक स्थिती (३.२)**

१ शिक्षणाच्या बाबतीत जागृती व शिक्षणाची गोडी निर्माण करण्याकरिता प्रौढ शिक्षण योजनाअंतर्गत दुर्गम व आदिवासी भागात महिला प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविण्यात यावे. उपस्थित महिलांना धान्य अथवा पैशाच्या स्वरुपात उपस्थिती भत्ता देण्यात यावा. आदिवासी महिलांमध्ये शिक्षण घेण्याची इच्छा व ओढ निर्माण होण्याकरिता दृक श्राव्य माध्यमातून शिक्षण प्रचार व प्रसार करण्यात यावा. शासकीय विभागांबरोबरच लौकिक मिळविलेल्या स्वयंसेवी संस्थांना सुध्दा या कामी सहभागी करण्यात यावे.

२. महिला शिक्षण सुधार ही संकल्पना शासनाने ध्येय प्रेरित स्वयंसेवी संस्थामार्फत राबवावी. तसेच अशिक्षित महिलांची निवड करुन त्यांचे संपूर्ण कुटुंब दत्तक घेऊन त्या कुटुंबाच्या शैक्षणिक विकासाकरिता प्रयत्न केले जावेत.

३. शासनामार्फत मुलींना शिष्यवृत्ती देण्याची योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यात यावी. त्याचप्रमाणे शिष्यवृत्ती मध्ये वाढ करण्यात यावी.

- **शिक्षणाची इच्छा व ओढ निर्माण होण्यासाठी दृक श्राव्य माध्यमाचा वापर मोठया प्रमाणात करणे**
- **मुलींना शिष्यवृत्ती देण्याची योजना अधीक प्रभावीपणे राबविणे**

**आरोग्य विषयक बाब [३.३]**

१. कुटुंब नियोजन म्हणजे योग्य वयातच मुलं झाली पाहिजेत, दोन मुलांमध्ये योग्य अंतर ठेवले गेले पाहिजे, मुलांची संख्या मर्यादित असली पाहिजे, सदोष अपत्य जन्माला येऊ नये यासाठी व स्वत:च्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी या महिलांना कुटुंब नियोजनाची मदत घेता येते हे समजावून सांगणे आवश्यक आहे.

२. मातृत्व अनुदान योजना ही एक चांगली योजना असून त्या योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे केल्यास त्या योजनेच्या लाभातून प्रसुती व तत्सम प्रसंगी होणाऱ्या त्रासांची तीव्रता कमी होऊ शकेल.

३. आदिवासी युवक युवतींना खालील बाबींवर मार्गदर्शन (Counselling) करणे आवश्यक आहे:-

अ. कायद्यान्वये निश्चित करण्यात आलेले मुलामुलीचे लग्नाचे वय,

ब. लहान कुटुंबाचे (अपत्यांची संख्या मर्यादित असण्याचे) सर्वमान्य प्रमाण,

क. दोन मुलांमध्ये वाजवी अंतर ठेवण्याचे महत्व,

ड. सकस अन्न (Nutrition),

इ. वैयक्तिक व सार्वत्रिक आरोग्य रक्षणार्थ घ्यावयाची खबरदारी.

- **कुटुंब नियोजनाची योग्य माहिती करुन देणे**
- **मातृत्व योजना अधिक प्रभावीपणे राबविणे**
- **आदिवासी युवक युवतींना मार्गदर्शन (Counselling) करणे**

**आर्थिक स्थिती (३.४)**

१. सेवा योजन कार्ड ही सेवा कोणालाही उपलब्ध आहे. यात शिक्षणाची अट नाही. साधारणत: जोनवारी ते मे या महिन्यात त्यांना कुठलीच कामे नसल्याने सेवा योजन विभागाने प्रकल्प अधिकाऱ्याशी संपर्क साधून त्यांना कार्ड उपलब्ध करुन द्यावे. त्यामुळे किती रोजगारहीन महिला आहेत याची आकडेवारी कळू शकेल व त्यांना कुठली कामे देता येतील याचा विचार करुन प्रकल्प अधिकारी न्युक्लिअस बजेट अंतर्गत योजना हाती घेऊ शकतील.

२. शासनाच्या विविध विभागांनी प्रत्येक पाडयात प्रत्यक्ष भेटी देऊन महिलांना त्यांच्या साठी असलेल्या योजनांची माहिती करुन देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी प्रकल्प अधिकारी यांचे अधीनस्त एक फिरता "माहिती प्रसारण गट" (ज्यामध्ये विविध विभागांचे प्रतिनिधी असतील) तयार करुन योजनांची माहिती करुन देण्यात यावी. तसेच योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांना उद्युक्त करुन योजनांमध्ये त्यांना सहभागी करुन घेण्यात यावे.

पुणे जिल्हा परिषदेने ग्रामीण भागात व महानगरपालिका पुणे यांनी झोपडपट्टयांमध्ये "स्वयं सहाय्य गट" योजना महिला आर्थिक विकास महामंडळ **(माविम)** मार्फत राबविल्याने गरीब महिलांच्या जीवनात बदल घडून येत आहे. या योजनेव्दारे आर्थिक प्रगती कडे वाटचाल होऊन गरीब महिला या योजनचे उत्स्फूर्तपणे लाभ घेत आहेत.

**माविम** राबवित असलेल्या योजनेच्या धर्तीवर, केंद्रवर्ती अर्थसहाय्य (Nucleas Budget) व २७५ (१) तरतूदी मधून प्रत्येक प्रकल्पामध्ये पाडयांच्या स्तरावर प्रत्येकी एक या प्रमाणे आदिवासी महिलांकरिता "स्वयं सहाय्य बचत गट" आदिवासी विकास विभागामार्फत निर्माण करण्यात यावेत. हया योजनेचे नियोजन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी व महिला निरिक्षक यांच्याव्दारे करण्यात यावे. ही योजना राबविण्यासाठी बी.ए.आय.एफ. (BAIF), अकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्सेस, अे.एफ.अे.आर.एम. (AFARM) या सारख्या यशस्वी स्वयं सेवी संस्थांची (NGO) मदत घेता येईल.

➢ **फिरत्या "माहिती प्रसारण गटा" मार्फत योजनांचा प्रसार करणे**

### राजकीय स्थिती (४.५)

पंचायत (अनुसूचित क्षेत्रास विस्तारीत) कायदा, १९९६ यास अनुसरुन महाराष्ट्र राज्याने पारित केलेला अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींना स्वयंशासन करण्यासंबंधीचे अधिकार - याची माहिती अनुसूचित क्षेत्रातील प्रत्येक ग्रामसभेतील आदिवासी महिलांना जाणीव जागृती कार्यक्रमांतर्गत विशेष मोहिमांच्या माध्यमातून करुन देण्यात यावी.

यासाठी विशेष मोहिम राबवितांना पुढील योजनेचा उपयोग करण्यात यावा :-

विशेष केंद्रीय अर्थसाहाय्य अंतर्गत आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या "जन जागृती मेळावे" या योजनेच्या माध्यमातून उपरोक्त कायद्याची माहिती करुन देण्याबाबत भर देण्यात यावा.

➢ **पंचायत (अनुसूचित क्षेत्रास विस्तारीत) कायदा, १९९६-यांची माहिती अनुसूचित क्षेत्रातील प्रत्येक ग्रामसभेतील आदिवासी महिलांना विशेष मोहिमांव्दारे करुन देण्यास भर**

* * *

जोडपत्र - १

# संदर्भ सूची


१. धुळे जिल्हयातील (सर्व शैक्षणिक स्तरावरील शासकीय व निमशासकीय) शैक्षणिक संस्थामध्ये काम करणाऱ्या आदिवासी महिलांच्या शैक्षणिक समस्या- लेखिका- सौ.नलिनी पितांबर पाटील

२. कमी साक्षरता विभागातील शैक्षणिक समस्येचा विशेषत: आदिवासी जमातीतील स्त्रियांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास जि.अमरावती व पुणे

३. आदिवासींचे शिक्षण- प्रा.डॉ.नलिनी पिचड

४. आदिवासींचे शिक्षण- डॉ.गोविंद गारे

५. बदलत्या सामाजिक व आर्थिक जीवनामुळे आदिवासी स्त्रिची बदलणारी भूमिका आणि तिच्या आर्थिक व सामाजिक दर्जावर पडणारा प्रभाव- संशोधन प्रकल्प- प्रज्ञा नानल-ठाणे

६. महाराष्ट्रातील आदिवासी जमाती - डॉ.गोविंद गारे,

७. Status of Women - Rekhadevi Raju

८. महिला व बालविकास धोरण आणि निर्णय - १९७५ ते जानेवारी २००२
एक दृष्टीक्षेप - यशदा

९. Status of Women in Maharashtra १९८१ to १९९५

१०. Women in India - A statistical Panaroma P.P.Singh

११. विविध शासन निर्णय, परिपत्रके इत्यादि.


* * *

जोडपत्र - २

# प्रश्नावली

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१**
**आदिवासी महिलांची स्थिती सर्वेक्षण-२००३-०४**

**प्रश्नावली**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | महिलेचे पूर्ण नांव | | |
| २. | गांवाचे नांव | | |
| | तालुका | | जिल्हा |
| | | | |
| ३. | मूळ ठिकाण (माहेर) | | |
| ४. | गांव तालुका | | जिल्हा |
| ५. | जमातीचे नांव | | |
| ६. | जमातीचे प्रमाणपत्र प्राप्त केले आहे काय | | |
| ७. | सध्याचे वय वर्ष | | लग्नाच्या वेळी वय वर्षे |
| ८. | वैवाहिक स्थिती | | विवाहित |
| | | | अविवाहित |
| | | | विधवा |
| | | | घटस्फोटीत |
| **सामाजिक स्थिती** | | | |
| १ | कुटुंब प्रमुख आहात काय ? | | |
| २ | कुटुंब प्रमुखाशी नाते | | |
| ३ | कुटुंबांचा प्रकार | | एकत्रित/विभक्त |
| ४ | कुटुंबाचा व्यवसाय | | |
| ५ | मुलगी म्हणून जन्माला आल्याने कुटुंबात तुम्हाला आई-वडिलांकडून वेगळी वागणूक मिळाली काय | | |
| ६ | विधवा विवाहास परवानगी आहे काय | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | लग्न जमविण्याची पध्दत | | |
| ८ | लग्नात नवऱ्या मुलास हुंडा दिला काय | | |
| | होय असल्यास किती | | |
| ९ | तुमच्या पतीच्या किती बायका आहेत | | |
| | तुमचा क्रमांक कितवा | | |
| १०. | तुमच्या समाजात घटस्फोट घेण्याची पध्दत आहे काय | | |
| ११. | दुभार्या कायद्याबाबत मत काय | | |
| १२. | विधवा स्त्रीला धार्मिक कार्यात मान दिला जातो काय | | |
| | **शैक्षणिक स्थिती** | | |
| १. | आपले शिक्षण किती झाले | | |
| २. | अर्धवट शाळा सोडण्याचे कारण काय | | |
| ३. | आपल्या समाजात मुलींना शिकविण्याची पध्दत आहे काय | | |
| ४. | शिक्षण कोणत्या संस्थेत झाले | | जि.प.शाळा/शा.आ /खाजगी/महाविद्यालय |
| ५. | सेवायोजन कार्ड काढले आहे काय | | |
| | **आरोग्य स्थिती** | | |
| १. | आपल्याला किती मुले आहेत ? त्यापैकी किती हयात आहेत ? | | |
| २. | दोन मुलांमध्ये किती वर्षाचे अंतर आहे? | | |
| ३. | दररोज आहार घेता काय | | |
| ४. | प्रसुतीनंतर किती दिवसांनी घरातील कामाला सुरवात केली | | |
| ५. | प्रसुती | | घरी/दवाखान्यात |
| ६. | गर्भधारणापासून प्रसुती होईपर्यंत दवाखान्यात तपासणीसाठी जात होता काय | | |
| ६. | मातृत्व अनुदानाच्या योजनेचा लाभ मिळाला काय ? | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | कुटुंब नियोजन केले आहे काय ? | | |
| ८. | अंगणवाडी सेविका/दाई यांच्याकडून काही मदत मिळाली आहे काय | | |
| ९. | आपणास शारिरीक व्याधी आहे काय ? असल्यास कोणती ? | | |
| १०. | सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत कोणकोणत्या प्रकारची कामे करता | | |
| | अ. स्वयंपाक करण्याकरिता किती वेळ | | |
| | ब. पाणी भरण्याकरिता किती वेळ | | |
| | क. इंधन गोळा करण्याकरिता किती वेळ | | |
| | ड. मुले सांभाळण्याकरिता किती वेळ | | |
| | इ. मुलांच्या संगोपनाकरिता | | |
| | ई. इतर | | |
| ११. | आजारी पडल्यानंतर औषधोपचार कोणाकडून करण्यात येतो ? | | दवाखान्यात/भगताकडून |
| | **आर्थिक स्थिती** | | |
| १. | आपला व्यवसाय काय | | शेती/शेतमजुरी/जंगलमजुरी/इतर मजुरी/नोकरी/व्यवसाय |
| २. | दिवसाला किती रोज मिळतो (उत्पन्न) | | |
| ३. | पुरुषांपेक्षा स्त्रियांना कमी रोज मिळतो का | | |
| ४. | आपले कुटुंब दारिद्रय रेषेखाली आहे काय | | |
| ५. | आपण कुटुंबांवर अवलंबून आहात काय | | |
| ६. | शासनाच्या विविध योजनांची माहिती आहे काय | | |
| ७. | आपल्या कुटुंबाला कोणकोणत्या शासकीय योजनांचा लाभ मिळालेला आहे ? | | १.<br>२.<br>३.<br>४. |

| राजकीय स्थिती | | | |
|---|---|---|---|
| १. | आपण निवडणूकीमध्ये मतदानाचा हक्क बजावता काय | | |
| २. | आपल्या गांवातील ग्रामपंचायतीमध्ये आपण महिला सदस्य आहात काय | | १. ग्रामपंचायत २. तालुका पंचायत ३. जि.प. |
| ३. | ग्रामसभेबाबत आपल्याला माहिती आहे काय ? | | |
| ४. | आपल्या गांवात सहकारी संस्थेमध्ये महिला सदस्य आहेत काय | | |
| | १. अंगणवाडी सेविका/दाई यांचकडून घ्यावयाची माहिती | | |
| | | | |
| | २. आपले स्वत:चे अभिप्राय पत्रक भरणाऱ्याने लिहावेत. | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ठिकाण | | | पत्रक भरणाऱ्याची स्वाक्षरी |
| दिनांक | | | नांव |
| | | | हुद्दा |
| | | | |
| | | | |
| | | | तपासणी अधिकाऱ्यांची स्वाक्षरी |
| | | | नांव |
| | | | हुद्दा |

जोडपत्र - ३

# संशोधन पथक

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव व पदनाम | कर्मचाऱ्यांचे नांव व पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री एम.ए.शेख, अधिव्याख्याता | १. श्री एस.बी.खाडे, सांख्यिकी सहाय्यक |
| | | २. श्री सी.पी. गाढवे, वरिष्ठ लिपीक |
| | | |
| २. | श्री व्हि.बी.कांबळे, संशोधन अधिकारी | १. श्री जी.के. जाधव, संशोधन सहाय्यक |
| | | |
| ३. | श्रीमती एस.अे. मुंढे, संशोधन अधिकारी | १. श्रीमती एस.ए.तेलोरे, कनिष्ठ लिपीक |
| | | |
| ४. | श्री एस.बी. दराडे, संशोधन अधिकारी | १. श्री एस.आर.तरकसबंद, संशोधन सहाय्यक |
| | | |
| ५. | श्री आर.एल.बिरारीस, संग्रहालय अभिरक्षी | १. श्री सी.जे.मोहिते, कनिष्ठ लिपीक |
| | | |
| ६. | श्री के.एस.चव्हाण, सांख्यिकी अधिकारी | १. श्री पी.बी. कुदळे, संशोधन सहाय्यक |
| | | |
| ७. | श्री आर.बी.मानकर, अधिव्याख्याता | --- |